# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०१/०१/२०२२

**प्रेसनोट**

दि.१६ जानेवारी, २०२१ पासुन देशात कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रमास सुरुवात झाली असून केंद्र शासनाच्या सूचनांना अनुसरून राज्यामध्ये व त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

जगात वाढत असलेले कोविड रुग्ण व आढळून येत असलेल्या ओमायक्रॉन व्हेरीयंटमुळे केंद्र शासनाने कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण वाढविण्यासाठी पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

- ➡ दिनांक ०३ जानेवारी, २०२२ पासून १५ ते १८ वयोगटातील सर्व मुलांना / लाभार्थ्यांना कोविड प्रतिबंधक लसीकरण सुरु करण्यात यावे व त्यांच्या लसीकरणासाठी केवळ **'कोव्हॅक्सीन'** लसीचाच वापर करावा.
- ➡ सदर लसीकरणाकरिता केवळ सन २००७ व त्याआधी जन्म वर्ष असलेले ( **फक्त १५ ते १८ वयोगटातील**) लाभार्थी हे पात्र राहतील.
- ➡ लाभार्थ्यांना लसीकरणासाठी को -विन ॲप सिस्टीमवर स्वत:च्या मोबाईल नंबरद्वारे नोंदणी करता येईल. ही ऑनलाईन सुविधा **दि.०१ जानेवारी, २०२२** पासून सुरु होईल.
- ➡ लसीकरण केंद्राच्या ठिकाणी (Onsite) जाऊन नोंदणी करण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे.
- ➡ लसीकरण केंद्रावर येताना सोबत आधार कार्ड/ शाळेचे ओळखपत्र/ जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला यांपैकी एक कागदपत्र घेऊन यावे.

त्यानुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात **दि.०३ जानेवारी, २०२२** रोजी खालील लसीकरण केंद्रांवर **फक्त १५ ते १८ वयोगटातील** लाभार्थ्यांचे **५०% ऑनलाईन व ५०% ऑनसाईट** नोंदणीद्वारे खालीलप्रमाणे कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरणाचे नियोजन करण्यात आले आहे.

**SESSION FOR CHILDRENS**

(ONLY FOR CHILDRENS BETWEEN AGE GROUP 15-18 YRS)

| SR. NO | NAME OF VACCINATION CENTRES | TOTAL NO OF DOSES (COVAXIN) AGE CRITERIA (15-18 YRS AGE GROUP) 1ST DOSE | 2ND DOSE | TOTAL DOSES |
|---|---|---|---|---|
| 1 | Phoolpada Dam, Virar (East) 50% ONLINE 50% OFFLINE | 1000 | - | 1000 |
| 2 | BOLINJ MCH, Virar (West) 50% ONLINE 50% OFFLINE | 1000 | - | 1000 |
| 3 | SOPARA GENERAL HOSPITAL, Nallasopara (West) 50% ONLINE 50% OFFLINE | 1000 | - | 1000 |
| 4 | Achole UPHC-Majethiya natyagruha, Nallasopara (East) 50% ONLINE 50% OFFLINE | 1000 | - | 1000 |
| 5 | St. Anthony Convent School, Koliwada, Vasai (West), Under Vasai UPHC 50% ONLINE 50% OFFLINE | 1000 | - | 1000 |
| 6 | Karmaveer Bhavrao Patil Vidyalaya, Sane guruji marg, Juchandra, Naigaon (East) Under Juchandra,UPHC 50% ONLINE 50% OFFLINE | 1000 | - | 1000 |
| 7 | Agarwal CVC, Vasai (East) 50% ONLINE 50% OFFLINE | 1000 | - | 1000 |
| 8 | Om Nagar OPD, Vasai (West) 50% ONLINE 50% OFFLINE | 500 | - | 500 |
| TOTAL NO OF SESSIONS | 8 | TOTAL NO. OF DOSES | | 7500 |

वरील लसीकरण केंद्र वगळून महानगरपालिकेच्या **इतर लसीकरण केंद्रांवर सुरु असलेले १८ वर्षावरील नागरिकांचे लसीकरणही नियमितपणे सुरु राहील.**

**टीप :** नागरिकांना शासकीय लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी मोफत लस देण्यात येईल. ज्या नागरिकांना खाजगी लसीकरण केंद्रांवर लस घ्यायची असेल अशा नागरिकांसाठी केंद्र शासनाने पूर्वी घोषित केलेल्या किंमतीमध्ये लसीकरण करता येईल. त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**